| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय<br>लोहमार्ग मुंबई | सत्यमेव जयते<br>**महाराष्ट्र शासन**<br>पोलीस आयुक्त कार्यालय, लोहमार्ग मुंबई. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

दुरध्वनी क्रमांक :- 022-23759283 पशा-02 (वरिष्ठ आस्थापना), एरिया मॅनेजर बिल्डींग 04 था मजला पी.डी.मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई. 4000-10 Email ID :- cb2mumrly@gmail.com

जा. क्रमांक पोआलो/पशा-2/विधी अधि /कंत्राटी भरती /जाहिरात/ 2022 / 1191 | दिनांक :- 1 /02 /2022

प्रति,

**संचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, नविन मंत्रालय,**
**जी.टी. रुग्णालय संकुल,**
**मुंबई 4000 01**

**विषय :-** विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी पदे नव्याने नियुक्ती करणेकरिता जाहिरात

----------//////////----------

उपरोक्त विषयान्वये विनंती करण्यात येते की, ह्या पत्रासोबत जोडलेली विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी पदे कंत्राटी पध्दतीने नव्याने नियुक्त करण्याबाबतची जाहिरात शासन मान्यताप्राप्त वृत्तपत्रात प्रकाशीत करण्या करीता सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | | माहिती |
|---|---|---|---|
| 01 | कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई यांचे कार्यालय, चौथा मजला, एरिया मॅनेजर बिल्डीग सेंट्रल रेल्वे गुड्स यार्ड, पी.डी.मेलो मार्ग वाडीबंदर मुंबई - 4000 010 |
| 02 | जाहिरात प्रकाशित करण्याचा दिनांक | :- | प्रकाशनात असलेल्या निकटच्या अंकात दि. **04/02/2022** रोजी / पुर्वी |
| 03 | जाहिरतीचे स्वरुप | :- | जिल्हा स्तरावर |
| 04 | जाहिरात कोणत्या भाषेत व किती वृत्तपत्रात प्रकाशीत करावयाची आहे | :- | मराठी :- लोकसत्ता,<br>इंग्रजी :- इंडीयन एक्सप्रेस, टाईम्स ऑफ इंडीया, फ्री प्रेस जर्नल<br>उर्दु :- इंकलाब.<br>हिंदी :- नवभारत टाईम्स. |
| 05 | प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळा जाहिरात देण्यात यावी | :- | 01 वेळा |
| 06 | जाहिरात देयक प्रदान करण्याकरिता कोणत्या अधिकाऱ्यांचे नावाने पाठविण्यात यावी | :- | पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई |

**सहपत्र** :- विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने नव्याने नियुक्त करणेबाबतची जाहिरात (मराठीत 06 प्रति)

**(कैसर खालिद)**
पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, तांत्रीक शाखा लोहमार्ग मुंबई.**

**2/-** सोबत असलेले विधी अधिकारी पदांकरिताचे करार वेतन, शैक्षणीक आर्हता वयोमर्याद, अनुभव, कर्तव्य व जाबाबदाऱ्या अटी व शर्ती, तसेच विहती अर्जाचा नमुना, अशी तपशीलवार माहिती **www.mumbairlypolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
लोहमार्ग मुंबई

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, लोहमार्ग मुंबई.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक :- 022-23759283 पशा-02 (वरिष्ठ आस्थापना), एरिया मॅनेजर बिल्डींग पी.डी.मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई. 4000-10 Email ID :- cb2mumrly@gmail.com

# -: जाहिरात :-

## पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई कार्यालय

पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई आस्थापनेवरील विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकरता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदानाम | पदसंख्या | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | विधी अधिकारी गट ब | 01 | पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई |
| 02 | विधी अधिकारी | 05 | |

सदर विधी अधिकारी पदांकरीताचे करार वेतन शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, कर्तव्ये व जाबाबदाऱ्या अटी व शर्ती तसेच विहित नमुना, अशी तपशीलवार माहिती **www.mumbairlypolice.gov.in** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध असुन मागणी केल्यास पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई कार्यालय एरिया मॅनेजर बिल्डींग चौथा मजला, सेंट्रल रेल्वे गुड्स यार्ड, पी.डी.मेलो मार्ग वाडीबंदर मुंबई - 4000 010 या पत्यावर उपलब्ध केली जाईल.

**टिप :-**

1) सदर विधी अधिकारी पदांकरिता मागविण्यात आलेले विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक **21/02/2022** पर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
2) सदर पदांची नेमणुक ही पुर्णत: मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीची असल्याने उमेदवार शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणुन गणला जाणार नाही.

**(कैसर खालिद)**
पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई.

लोहमार्ग मुंबई

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
पोलीस आयुक्त कार्यालय, लोहमार्ग मुंबई.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक :- 022-23759283 पशा-02 (वरिष्ठ आस्थापना), एरिया मॅनेजर बिल्डींग पी.डी.मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई. 4000-10 Email ID :- cb2mumrly@gmail.com

# -: जाहिरात :-

## पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई कार्यालय

पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई आस्थापनेवरील विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकरता विहिती नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदानाम | पदसंख्या | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | विधी अधिकारी गट ब | 01 | पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई |
| 02 | विधी अधिकारी | 05 | |

**टिप :-**

1) वर दर्शविलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एपीओ/3106/प्र.क्र.227/पोल-3 दिनांक 21/08/2006 व शासन गृह विभाग क्रमांक एसपीपी/2005/प्र.क्र./247/पोल-10 दिनांक 15/09/2006 अन्वये पोलीसांकडुन दाखल होणारे खटले विधीवत दाखल व्हावे त्यासाठी त्यांना योग्यते वैधानिक सहाय्यक मिळावे व गुन्हेगारांना शासन होवुन कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी तसेच पोलीस प्रशिक्षण संस्थांमध्ये पोलीसांना कायदेविषयक प्रशिक्षण देणे सुलभ व्हावे म्हणुन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आस्थापनेवर विधी विषय अधिकारी यांची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

तरी पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई आस्थापेनवरील विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची कंत्राटी पदे भरावयाची असल्याने खालील अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या उमेदवारांनी सदर पदाकरीता जाहीरातीत दिलेल्या नमुना फॉर्म मध्ये विनंती अर्ज दिनांक **21/02/2022** रोजी पर्यंत पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई कार्यालयाचे वरील नमुद पत्यावर पोहोचेल असे पाठवावे. तदनंतर प्राप्त झालेल्य विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद द्यावी.

➤ **करारातील मासिक देय रक्कम (वेतन) :-**

| अ.क्र | पदानाम | मानधन + दुरध्वनी व प्रवासखर्च |
|---|---|---|
| 01 | विधी अधिकारी गट-ब | रु. 25,000/- + 3,000/- |
| 02 | विधी अधिकारी | रु. 20,000/- + 3,000/- |

➤ **शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा व अनुभव :- विधी अधिकारी गट -ब व विधी अधिकारी**

1) **शैक्षणिक अर्हता :-**
उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असावा व सनदधारक असावा
उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

2) **वयोमर्यादा :-**
विध अधिकारी गट ब व विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक **21/02/2022** रोजी **60** वर्षापेक्षा जास्त नसावे.

3) **अनुभव :-**
विधी अधिकारी, गट ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासकिय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती. तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञान असले ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

**किंवा**

जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याने ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्ती बाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ति निवडीस अपात्र असेल.

➢ **विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी पदाची कर्तव्ये व जाबाबदाऱ्या :-**

1) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे
2) सेवाविषयक / प्रशासकिय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे
3) प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञाप्रत संबधिंत अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
4) शपथपत्रांचा मसुदा तयार करणे व त्यास समक्ष प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवुन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे
5) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन त्या अनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6) अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करुन तो संबधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अतिंम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे
7) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे
8) पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

➢ **अटि व शर्ती :-**

1) मा. सवौच्च न्यायालाय नवी दिल्ली येथे दाखल असलेल्या विशेष हक्क याचिका क्रमांक 1900819009 महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्रमांक 20182/12 श्री नारायण तुकाराम पंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यामधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती राहील.
2) सदर पदांची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल उमेदवाराला शासकिय कर्मचारी / अधिकारी म्हणुन गणले जाणार नाही.
3) **उमेदवाराची निवड लेखी परिक्षा तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल लेखी परिक्षा 50 गुणांची व तोंडी परिक्षा 25 गुणांची असेल, नियुक्ती देणेसाठी कमीत कमी 60% गुण असणे आवश्यक राहील तसेच त्याबाबत आपणास लेखी / भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात येईल.**
4) उमेदवाराला मुलाखतीसाठी कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.
5) सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: 11 महिन्यांसाठी करण्यात येतील. 11 महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी जास्तीत जास्त 02 वेळा 11 महिन्यांकरिता वाढविता येईल मुदतवाढीसाठी 03 वेळा नियुक्ती दिल्यांनतरही अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.
6) निवड केलेला उमेदवार 11 महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायांशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्रधिकाऱ्यांच्या लेखी परवानगी शिवाय करुन शकरणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सदरबाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल तर तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल. तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. व नियमानुसार त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

7) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील. करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्च व प्रवास खर्चा व्यतिरीक्त (उपरिनिर्दिष्ट मार्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

8) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट ब आणि विधी अधिकारी या पदासाठी अर्ज असे स्पष्ठ नमुद करुन दिनांक **21/02/2022** पर्यंत पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई. चौथा मजला, एरिया मॅनेजर बिल्डींग मध्य रेल्वे गुड्स यार्ड पी.डी.मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई या पत्यावर पोहोचेल यांची दक्षता घ्यावी. दिनांक **21/02/2022** नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता तसेच ईमेल आयडी व मोबाईल नंबर असलेले दोन लिफाफे जोडावेत

9) उमेदवाराने वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव व अटी अर्ज करतेवेळी पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

10) अर्जासोबत 2.5 cm X 2.5 cm आकाराचे सध्याचे काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

**पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई**
**यांचे कार्यालय.**

**अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

मी. श्री / सौ / कु.______________________________ या द्वारे प्रतिज्ञापुर्व असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणीक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची सर्वस्वी पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

**अर्जदाराची सही**

**ठिकाण** :-

**दिनांक** :-

**(दिनांकसह)**

**सोबत :- अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणीत केलेल्या छायांकीत प्रती.**

| लोहमार्ग मुंबई | **पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई**<br>**यांचे कार्यालय.**<br><br>**विधी अधिकारी गट ब / विधी अधिकारी यांनी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती मिळणेबाबत सादर करावयाच्या अर्जाचा नमुना** | **फोटो** |
|---|---|---|

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती

**सुचाना** :- अर्जदाराने माहिती माराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणीच माहिती इंग्रजीत लिहावी आवश्यक नसेल तेथे खोडावे. व अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

_________________________ **पदाकरीता अर्ज सादर.**

1) **अर्जदाराचे संपुर्ण नाव** :- **आडनाव** **नांव** **वडिलांचे /पतीचे नांव**

**मराठीत** :-

**इंग्रजीत** :-

2) **पत्रव्यवहाराचा पत्ता** :-
तालुका :- जिल्हा :- पिनकोड :- ☐☐☐☐☐☐

3) **कायमचा पत्ता** :-
तालुका :- जिल्हा :- पिनकोड :- ☐☐☐☐☐☐

4) **दुरध्वनी क्रमांक** :- लॅन्डलाईन - _______________ मोबईल क्रमांक :- ________________________

5) **जन्म दिनांक** :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्मस्थळ :- _______________________
दिवस महिना वर्ष.

6) **दिनांक** ___________ **रोजीचे वय** : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
दिवस महिना वर्ष.

7) **लिंग** :- पुरुष ☐ / महिला ☐

8) **धर्म** :- _______________ **जात** :- ____________________

9) **क्रिमीलेअर आहे का** :- होय ☐ नाही ☐

10) **महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात का** ? होय ☐ नाही ☐
योग्य असेल त्या ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.

## ब ) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

11) **शैक्षणिक अर्हता.** :-

| शिक्षण | शैक्षणीक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. 10 वी) | | | | | |
| 2. पदवी | | | | | |
| 3. विधी पदवी | | | | | |

12) **इतर शैक्षणिक अर्हता**
संगणक प्रशिक्षीत आहेत का ? होय ☐ नाही ☐

13) **अर्जदाराची इतर माहिती** :-

**अ)** सनद स्विकारल्याचा दिनांक :- ____________________

**ब)** उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल :-

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 |

- टिप :- वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

14) **<u>खालील नमुद माहिती बाबत योग्य असेल त्या ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.</u>**

अ. अर्जदारास यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना / निवडनुकींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोण्यत्याही विद्यापीठाकडुन किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक प्राधिकरणाकडुन / संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? / काढुन टाकण्यात आले आहे काय ? होय ☐ नाही ☐

ब. हा अर्ज भरते वेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबीत आहे काय ? होय ☐ नाही ☐

(14-अ किंवा 14-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड दोष सिध्दी शिक्षा आदेश इत्यादींचा संपुर्ण तपशिल आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणीक प्राधिकारणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

**ठिकाण** :-

**दिनांक** :-

**अर्जदाराची सही**
**(दिनांकसह)**

# <u>कार्यालयीन उपयोगासाठी</u>

1) **अर्ज क्रमांक** :- ☐☐☐☐☐

2) **अर्ज स्वीकारल्याचा दिनांक** :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

3) **अर्ज स्वीकारल्याची स्वाक्षरी (दिनांकासह)** :- ____________________